N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** करमाळा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0602 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**19/09/2024 16:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 22/08/2024
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/08/2024
**Time From (वेळेपासून):** 13:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 19/09/2024 **Time (वेळ):** 15:39 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 026
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/09/2024 15:39 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 35 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मंडळ अधिकारी कार्यालय केत्तुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मनोज दत्तात्रय घनवट

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा मु पो सोगाव, ता करमाळा,करमाळा ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा मु पो सोगाव, ता करमाळा,करमाळा ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9922098700

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शंकर विठ्ठल केकाण | | | 1. रा 164, गोविंद बापु नगर, जेऊर,करमाळा ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि:- 19/09/2024

मी मनोज दत्तात्रय घनवट, वय 36 वर्षे, व्यवसाय शेती व वकीली, रा. मु. पो. सोगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर मो.नं. 9922098700 समक्ष उपस्थित राहुन फिर्याद देतो की,

मी दि. 22/08/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील पोलीस निरीक्षक, श्री उमाकांत महाडिक यांचेशी संपर्क साधुन माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. त्यावरुन पोनि महाडिक यांनी मला दि. 22/08/2024 रोजी 13.30 वा. पारेवाडी रेल्वे स्टेशन येथे येण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी सदर ठिकाणी येवुन थांबलो असता तेथे काहीवेळातच पोनि महाडिक शासकीय वाहनाने आले. तेथे पोनि महाडिक यांनी मला वाहनात बसण्यास सांगुन वाहनात उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांची व माझी एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी सांगीतलो की,

मी कुणबी मराठा समाजाचा असून त्याबाबत माझे पुर्वज हे कुणबी असल्याचे तहसिल कार्यालय करमाळा येथे नोंद मिळून आल्या असून त्या नोंदीचे अधारे मी माझी मुलगी कु. श्रीशा मनोज घनवट हिचे कुणबी जात प्रमाणपत्र मिळणेकरीता तहसिल कार्यालय करमाळा येथे सर्व कागदपत्रांसह दि. 14/08/2024 रोजी अर्ज सादर केला होता. सदर अर्जावरुन तहसिल कार्यालय करमाळा येथे पुढील कार्यवाही होवून सदर प्रकरणामध्ये मंडळ अधिकारी यांचेकडुन पडताळणी होणे आवश्यक असल्याने सदरचे प्रकरण संबधीत मंडळ अधिकारी केत्तूर यांचेकडे सादर करणेकामी दि. 20/08/2024 रोजी माझ्याकडे दिले. त्याप्रमाणे मी सदर प्रकरणाचे सर्व कागदपत्रे दि. 21/08/2024 रोजी श्री. केकाण मंडळ अधिकारी केत्तूर यांचेकडे जमा केले. सदरवेळी श्री. केकाण यांनी माझ्या मुलीचे कुणबी मराठा जात प्रमाणपत्राच्या अनुषंगाने पडताळणी करुन तहसिल कार्यालय करमाळा येथे अहवाल सादर करण्याकरीता 3,000/- रुपये लाचेची मागणी केली असुन मंडळ अधिकारी श्री. केकाण यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार सांगीतली व तशी सविस्तर हस्तलिखित तक्रार नोंदविली.

त्यानंतर पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहीती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर मंडळ अधिकारी केकाण यांच्यावर मंडळ अधिकारी कार्यालय केत्तुर येथे पडताळणी कारवाई करण्याचे अनुषंगाने पोनि महाडिक यांनी मला तसेच पंच 01 यांना योग्य त्या सुचना देवुन त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्या मोटार सायकलवरुन मंडळ अधिकारी कार्यालय केत्तूर येथे पाठविले. त्याप्रमाणे आम्ही मंडळ अधिकारी कार्यालय केत्तूर येथे गेलो. तेथे मंडळ अधिकारी केकाण हे उपस्थित होते. सदर ठिकाणी मंडळ अधिकारी केकाण यांनी माझ्या मुलीच्या कुणबी जात प्रमाणपत्राच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई पुर्ण झाल्याचे सांगुन पुढील कार्यवाही सांगीतली. व हाताने पैश्याचा इशारा करुन लाच रक्कमेची मागणी केली. त्यावर मी त्यांना विचारणा केली असता मंडळ अधिकारी केकाण यांनी माझ्याकडे 3,000/- रूपये लाच रक्कमेची मागणी केली. सदर लाच रक्कमेमध्ये मी तडजोड करण्याचा प्रयत्न केला असता मंडळ अधिकारी केकाण यांनी तडजोडीअंती 1,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली. त्यावर मी त्यांना घेवुन येतो असे म्हणुन पंच 01 यांच्यासह पुन्हा पोनि महाडिक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली.

मंडळ अधिकारी केकाण यांनी माझ्या मुलीचे कुणबी जात प्रमाणपत्राच्या अनुषंगाने पडताळणी करुन अहवाल देण्याकरीता माझ्याकडे 3,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 1,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली असल्याने मंडळ अधिकारी श्री केकाण यांचेवर मंडळ अधिकारी कार्यालय केत्तुर येथे सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी शासकीय वाहनात सर्व सापळापुर्व कार्यवाही पुर्ण करण्यात आली व मी

हजर केलेली लाच रक्कम 1,000/- रुपये त्यामध्ये 500/- रु दराच्या 02 चलनी नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटांची घडी करुन माझ्या नेसते पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यामध्ये ठेवण्यात आल्या. त्यानंतर पोनि महाडिक यांनी सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या-त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.
सदरवेळी मी पोनि महाडिक व दोन्ही पंचाना कळविले की, पडताळणी कारवाई दरम्यान मंडळ अधिकारी केकाण हे त्यांना कामानिमीत्त करमाळा येथे जायचे असलेबाबत सांगुन घाई करीत होते. त्यामुळे आतापावेतो ते निघुन गेले असावेत. त्यावरुन पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन मी माझ्या परीचित इसमाकडून मंडळ अधिकारी केकाण यांचेबाबत माहीती घेतली असता ते कार्यालय बंद करुन निघुन गेले असलेबाबत माहिती प्राप्त झाली. त्यावरुन मंडळ अधिकारी केकाण यांना फोन करुन ते जेथे असतील तेथे थांबवुन त्यांचेवर सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले परंतु तसे केल्यास मंडळ अधिकारी केकाण यांना माझा संशय येवुन ते माझ्याकडुन लाच रक्कमेचा स्विकार करणार नाहीत. त्यामुळे माझ्या विनंतीवरुन पुढील सापळा कारवाई स्थगीत करण्यात आली.
त्यानंतर मंडळ अधिकारी केकाण हे रजेवर गेले असल्याबाबत माहीती समजली त्यामुळे माझा मंडळ अधिकारी केकाण यांचेशी माझा संपर्क होवु शकला नाही. तसेच त्यांनी देखील त्यानंतर माझेशी लाच रक्कमेच्या अनुषंगाने संपर्क साधला नाही. व यापुढे देखील मंडळ अधिकारी केकाण हे लाच रक्कमेच्या अनुषंगाने माझ्याशी संपर्क साधतील अथवा माझ्याकडुन लाचेच्या रक्कमेचा स्विकार करतील असे मला वाटत नसुन दि. 22/08/2024 रोजी झालेल्या पडताळणी कारवाईमध्ये मंडळ अधिकारी केकाण यांनी माझ्या मुलीचे कुणबी प्रमाणपत्राच्या अनुषंगाने पडताळणी होवून अहवाल देण्याकरीता माझ्याकडे 3000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंति 1000/- रुपये लाचेची मागणी केली असल्याने त्यांच्यावर पुढील योग्यती कारवाई करणेबाबत विनंती करुन तसा दि. 09/09/2024 रोजी जबाब दिला आहे. सदर कालावधीमध्ये मी, माझ्याकडे पैशाची मागणी करत असलेले मंडळ अधिकारी केकाण यांचेबाबत माहीती काढली असता केकाण यांचे संपुर्ण नाव शंकर विठ्ठल केकाण वय- 55 वर्षे, पद- मंडळ अधिकारी, नेमणूक मंडळ अधिकारी कार्यालय केत्तुर, ता.करमाळा जि.सोलापूर रा. 164, गोविंद बापु नगर, जेऊर, ता. करमाळा जि. सोलापूर असे अल्याबाबत माहीती मिळाली असुन त्याबाबत मी खात्री केली आहे.
तरी दि. 22/08/2024 रोजी 13.50 ते 14.09 वा.चे दरम्यान श्री. केकाण, मंडळ अधिकारी केत्तूर यांनी मंडळ अधिकारी कार्यालय केत्तुर येथे माझ्या मुलीचे कुणबी जात प्रमाणपत्राच्या अनुषंगाने कागदपत्रांची पडताळणी करुन अहवाल देण्याकरीता माझ्याकडे 3000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 1,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन स्वत:चा वैयक्तिक आर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केला असल्याने माझी मंडळ अधिकारी श्री. केकाण यांच्याविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालयातील संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंटर काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला स.ता.म.

(उमाकांत महाडिक)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Vinod Prabhu Ghuge(I (Inspector)) / PI or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Thanvat 19/9/24.

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Vinod Prabhu Ghug
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI